सुविचार
सातत्याने काम करणारे
कधीही पराभूत होत नाहीत.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



पवनचक्कीत भरडला जातोय वाशी तालुक्यातील शेतकरी
पेज 4

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 151 ■ शनिवार, दि.12 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# ‘ए आय’च्या वापरातून जिल्ह्यातील ऊस उत्पादनात होणार ४० टक्क्यांची वाढ

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या मदतीने जिल्ह्यातील २० हजार हेक्टरवर होणार ’ए आय’ चा वापर

### उत्पादन खर्चात आणि पाण्यात होणार ३० टक्क्यांची बचत

सज्जन यादव | आरंभ मराठी


धाराशिवः जिल्ह्यात ऊस उत्पादनात क्रांती घडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे कृत्रिम बुद्धिमत्तेवर (ए आय) आधारित महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील उसाचे क्षेत्र ५५ हजार हेक्टरहून अधिक असून, यापैकी २० हजार हेक्टरवर ए आय तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस उत्पादनात वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादन वाढवणे, खर्च कमी करणे, पाणी बचत आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ऊस उत्पादनात एआय तंत्रज्ञानाचा वापर कृषी विज्ञान केंद्र, बारामती, मायक्रोसॉफ्ट आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सहकार्याने सुरू करण्यात येणार आहे. एआय तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ऊस उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत वाढ, पाणीवापरात ३० टक्केपर्यंत बचत, उत्पादन खर्चात २५–३० टक्के बचत, पारंपरिक पद्धतीपेक्षा ५०–७० टक्के अधिक नफा, कीड व रोगांविषयी आगाऊ माहिती मिळणे अशा पद्धतीचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. या प्रकल्पासाठी २५ हजार रुपये प्रति हेक्टर खर्च अपेक्षित आहे. यापैकी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ९२५० रुपये, संबंधित साखर कारखाना ६७५० रुपये तर शेतकऱ्यांचा वाटा ९००० रुपये असणार आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील एक लाख शेतकऱ्यांना याचा लाभ दिला जाणार आहे. हे अर्ज ‘पहिले येईल त्याला प्राधान्य’ या तत्त्वावर स्वीकारले जाणार आहेत. यामध्ये ठिबक सिंचनाचा वापर करणारे शेतकरी, एकाच प्रकारची जमीन असलेले गटबद्ध शेतकरी (२५–४० शेतकरी गट) यांना प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी शेतकरी सदस्य असलेल्या कारखान्यांकडे तात्काळ करारनाम्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. तसेच एआय प्रणालीत हवामान केंद्र आणि मातीतील सेन्सरद्वारे पाणी व्यवस्थापन, अन्नद्रव्य नियंत्रण, कीड व रोग व्यवस्थापन याबाबत अचूक मार्गदर्शन मिळणार आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्प अंमलबजावणीसंदर्भात बैठक गुरुवारी (दि.१०) पार पडली. या बैठकीला नॅचरल शुगरचे बी.बी.ठोंबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, जिल्हा उपनिबंधक पांडुरंग साठे तसेच १६ साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुजार यांनी प्रत्येक साखर कारखान्याने किमान २५० शेतकरी आणि २० टक्के क्षेत्र (२०००० हेक्टर) या प्रकल्पांतर्गत आणण्याचे उद्दिष्ट जाहीर केले. शेतकऱ्यांचे करार वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडे तात्काळ सादर करून शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



### प्रयोगशील शेतकऱ्यांना मोठी संधी

ऊस उत्पादनात एआय चा वापर करून शेतकऱ्यांना उत्पादनात भरघोस वाढ करता येईल. शिवाय यामुळे उत्पादन खर्च कमी होणार आहे. ज्या कारखान्याचे शेतकरी सभासद आहेत, त्या कारखान्याकडे शेतकऱ्यांनी यासाठी अर्ज करावेत. जो प्रथम अर्ज करेल त्याला याचा लाभ मिळणार आहे. कारखाना आणि वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट हे खर्चाचा बराचसा भाग उचलणार असल्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च खूप कमी होणार आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊसामध्ये ठिबक सिंचन असणे अनिवार्य आहे. ऊस उत्पादनात प्रयोगशील शेती करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना ही मोठी संधी आहे.

**रवींद्र माने**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव.




### एआय तंत्रज्ञानामुळे ऊसशेतीत होणारे फायदे

- ऊसाच्या उत्पादनात ४०% वाढ होणार
- जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत
- खतांच्या वापरात सुमारे ३०% घट
- उत्पादन खर्चात २० ते ४० टक्क्यांची बचत
- सुमारे ३० टक्के पाण्याची बचत
- शेतकऱ्यांना पीक पद्धतीबद्दल अचूक सूचना
- साखर उतारा ०.५ ते २% ने वाढवणं शक्य

## धाराशिव रोटरी क्लबचा आज पदग्रहण समारंभ



रणजीत रणदिवे



प्रदीप खामकर

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव रोटरी क्लबचा २०२५–२६ च्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ शनिवारी (दि.१२) सायंकाळी साडेसहा वाजता शहरातील परिमल मंगल कार्यालयात होणार आहे. २०२५–२६ साठी नूतन अध्यक्ष म्हणून रणजीत रणदिवे आणि सचिव म्हणून प्रदीप खामकर सूत्रे स्वीकारणार आहेत. पदग्रहण सोहळ्यासाठी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, आनंदतारा ग्रुपचे प्रमुख तथा संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड, रोटरीचे सहायक प्रांतपाल गिरीश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.धाराशिव शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मावळते अध्यक्ष डॉ.श्रीराम जिंतूरकर, सचिव आनंद कुलकर्णी तसेच नूतन अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर यांच्यासह सदस्यांनी केले आहे.

## तुळजाभवानी मंदिरात चोऱ्या करणारी महिला ताब्यात

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात भाविकांच्या गळ्यातील सोने आणि रोख रक्कम हातचलाखीने चोरणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक केली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी रोहीत गणपत तावरे (वय २६ वर्षे, रा. माळेगाव ता. बारामती जि. पुणे) हे दिनांक १० जुलै रोजी दुपारी बारा वाजता श्री. तुळजाभवानी मंदीर येथे देवदर्शनास आले होते. त्यावेळी यज्ञ मंडप तुळजापूर येथे गर्दीचा फायदा घेवून संशईत आरोपी रविना चंद्रकांत काळे (रा.बालाजी नगर, भूम) या महिलेने गर्दीचा फायदा घेवून रोहीत तावरे यांच्या खिशातील १५,३०० रुपये चोरुन नेले. फिर्यादी रोहीत तावरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच गुन्हा तपासा दरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीवरुन तुळजापूर पोलीसांनी संशईत आरोपी रविना चंद्रकांत काळे हिला ताब्यात घेवून चोरीच्या गुन्ह्या संदर्भात तिच्याकडे चौकशी केली असता, तिने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच पोलीसांनी चोरीस गेलेल्या रक्कमपैकी आरोपीच्या ताब्यातुन ६,२४० रुपये रोख रक्कम जप्त केले असुन पुढील तपास चालू आहे.

## पैशांसाठी उचलून नेले, ज्येष्ठ नागरिकाचा संशयास्पद मृत्यू

### मारहाणीतून मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप

आरंभ मराठी | धाराशिव



केशेगाव येथील एका ज्येष्ठ नागरिकाचा संशयास्पद मृत्यू झाला असून, पैशाच्या व्यवहारातून मारहाण केल्यामुळे मृत्यू झाल्याचा आरोप मयताच्या मुलांनी आणि सुनेने केला आहे. याप्रकरणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात शुक्रवारी (दि.११) दिवसभर गोंधळ पहायला मिळाला. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, धाराशिव तालुक्यातील केशेगाव येथील मधुकर कोळगे यांनी एका व्यक्तीकडून ६० हजार रुपये घेतले होते. त्यांनी ते पैसे वेळेत परत केले नाहीत म्हणून पैसे देणाऱ्या व्यक्तीने मधुकर कोळगे यांना शेतमजुरीचे काम करण्यासाठी आठ महिन्यापूर्वी उचलून नेले होते. ६० हजार रुपयांची वसुली करण्यासाठी गेली आठ महिने अमानुषपणे शेतात राबवून घेतले असल्याचा आरोप मयताच्या मुलाने केला आहे. शुक्रवारी (दि.११) मधुकर कोळगे यांना शेतातील रेड्याने मारले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला असे मधुकर कोळगे यांच्या मुलांना आणि सुनेला सांगण्यात आले. मात्र मृतदेहाचा बदललेला रंग आणि मृतदेहावर असणारे व्रण पाहिल्यानंतर हा मृत्यू अमानुषपणे मारहाण केल्यामुळे झाला असल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. याप्रकरणी दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करून कारवाई केली जात नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा मयताच्या कुटुंबियांनी घेतल्यामुळे रात्री उशिरापर्यंत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण होते.

## जिल्हाधिकाऱ्यांची सोयाबीनमध्ये कोळपणी



जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी शुक्रवारी तुळजापूर तालुक्यातील शिवारात सोयाबीन कोळपणीच्या कामाचा अनुभव घेतला.

# महामार्गावरील उड्डाण पूल, भुयारी मार्गासाठी दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई?


## विधानसभेत बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे आश्वासन

### कामाच्या हलगर्जीपणाबाबत आमदार कैलास पाटील यांनी वेधले लक्ष

आरंभ मराठी | धाराशिव



महामार्ग व रस्ते सुरक्षेच्या बाबतीत आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात शुक्रवारी महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. यावर सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी आमदार पाटील यांच्या प्रश्नाची दखल घेतली. याबाबत माहिती घेऊन कारवाई करण्याचे आश्वासन मंत्री शिवेंद्र राजे यांनी दिले. यावेळी आमदार कैलास पाटील म्हणाले, येडशी – संभाजीनगर महामार्गावर गुत्तेदारानी अंडरपासची व उड्डाणपुलाची कामे घेतली आहेत. मात्र गुत्तेदार काम करत नाहीत, त्यामुळे अपघात वाढतात. धाराशिव शहराजवळ एका शाळेजवळ जुना उपळा रोडवर अंडरपास मंजूर होऊन त्याची निविदा झाली आहे. कामे वेळेत न झाल्याने एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. रस्ते सुरक्षा समितीची बैठक २७ जानेवारी २०२५ रोजी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीत ज्या सूचना दिल्या, त्याबाबत पुढे काहीच झाले नाही, या बैठकीला सहा महिने झाले. तरीही याबाबत कोणतीही कारवाई होत नाही. महामार्गाच्या गतीच्या संदर्भात बोलताना आमदार पाटील म्हणाले की, खामकरवाडी येथे वाहनाचा वेग इतका कमी होती की, चोर चालत्या गाडीवर चढतात आणि चोरी करतात. या भागात गाडीचा वेग कमी होत असल्याने लुटमारीचे प्रकार वाढले आहेत. काही ठिकाणी वेग मोठ्या प्रमाणात वाढतो आणि काही ठिकाणी कमी होतो.त्यामुळे वाटमारी होते. या घटनांचे रस्ता सुरक्षा समितीत निर्देश देऊन देखील ६ ते ७ महिने झाले याच अद्यापपर्यंत कुठलेही काम केले गेले नाही.सिंदफळ येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले नाही. धाराशिव शहरातील भुयारी मार्ग पूर्ण नाही. येडशी येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण नाही, कधीपर्यंत सुरू होतील हे सांगावे, असा सवाल आमदार पाटील यांनी उपस्थित केला.



### ..तर ठेकेदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकू

बांधकाममंत्री शिवेंद्रराजे म्हणाले की, आमदार पाटील यांनी सांगितलेल्या तिन्ही कामांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन ज्या ठिकाणी गुत्तेदारानी कामे घेऊन सुरू केली नसतील त्यांना दंडात्मक कार्यवाही करणे किंवा वेळ पडेल तर ब्लॅकलिस्ट देखील करण्यात येईल.रखडलेल्या कामांचा विषय विधानसभेत पोहोचल्याने आतातरी कामांना गती येईल, अशी आशा व्यक्त होत आहे.

# तुळजाभवानी मंदिरातील ब्राम्हदेवाची मूर्ती दुभंगल्याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करा

## महाराष्ट्र मंदिर महासंघाची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव




तुळजापूर येथे मंदिर विकास आराखड्याचे काम करताना अक्षय तृतीयेच्या दिवशी (दि.३०) मंदिरातील ब्राम्हदेवाची प्राचीन मूर्ती दुभंगली असून, याप्रकरणी दोषी असणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने शुक्रवारी (दि.११) पत्रकार परिषदेत केली. मंदिराचे काम सुरू असताना मंदिर परिसरातील १३ उपदेवतांच्या मूर्ती प्रशासनाने दुसरीकडे स्थलांतरित केल्या होत्या. त्यावेळी विठ्ठल रुक्मिणी, महादेव, ब्रम्हदेव, श्री गणेश, हनुमान अशा विविध देवतांच्या १३ मूर्ती स्थलांतरित केल्या आहेत. यामधील ब्राम्हदेवाची प्राचीन मूर्ती स्थलांतर करत असताना भंग पावली असून, त्यामुळे हिंदूंच्या भावना दुखावल्या असून, यातील दोषींवर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. या पत्रकार परिषदेला मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट, महंत मावजीनाथ महाराज, महंत इच्छागिरी महाराज, भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे परमेश्वर कदम, पाळीकर पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, ॲड. शिरीष कुलकर्णी, परीक्षित साळुंके आणि अन्य हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. मूर्ती भंग झाल्याप्रकरणी मागील अडीच महिन्यात सहा निवेदने दिली असून, त्यावर कारवाई झाली नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तुळजाभवानी मंदिरात कुलधर्म आणि कुलाचार यांना विशेष महत्व आहे. मात्र तरीही मंदिर विकास आराखड्यात कुलधर्म आणि कुलाचार या विधींना महत्व दिले नसल्याची टीका यावेळी केली. मंदिर विकास आराखड्याला विरोध नसून, या प्रक्रियेत पुजारी मंडळांना विश्वासात घेतले जात नसल्याची तक्रार यावेळी केली. तुळजाभवानी मंदिराला प्रशासनाकडून केवळ उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जात असून, लाखो लोकांच्या भावना मंदिराशी जोडलेल्या असल्यामुळे ब्राम्हदेवाची मूर्ती भंग झाल्याप्रकरणी दोषींना शोधून कडक कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला.

# लोकप्रतिनिधी की गुंड?



**मागील** आठवड्यात कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनी व्यासपीठावर, एका पोलिस अधिका–याच्या कानाखाली मारण्याचा प्रयत्न केला. अधिकारी ताबडतोब मागे सरकल्याने वाचला. त्याचा स्वाभिमान दुखावला गेला. अर्थात, हे अपेक्षितच होते. दुस–या दिवशी त्या अधिका–याने राजीनामा देत, सरकारने तो त्वरित स्वीकारून आपल्याला सेवेतून मुक्त करावे, अशी सरकारला विनंती केली. हे प्रकरण ताजे असतानाच, पावसाळी अधिवेशन चालू असताना शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी काल महाराष्ट्राची मान शरमेने खाली जाईल, असे कृत्य केले. संजय गायकवाड यांनी विधानभवनाच्या कँटीनमधून जेवण मागितले होते. त्यात भात हा शिळा होता, तर वरणाला दुर्गंधी येत असल्याचे गायकवाड यांचे म्हणणे होते. दुर्गंधीयुक्त जेवण आल्यामुळे आमदार साहेबांची सटकली. त्यांनी जाब विचारण्यासाठी आपल्या समर्थकांसह कँटीन गाठले.जेवण खराब आले असेल तर, जाब विचारण्यात गैर काहीच नाही. तेथील तक्रार वहीत तुम्ही तक्रार लिहू शकता. पण, आमदार असल्याचा अहंकार असल्याने गायकवाड यांनी मागचा पुढचा काहीच विचार न करता, बिल काउंटरवर बसलेल्या कर्मचा–याशी वाद घालत, त्याची कॉलर पकडून त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. संतापजनक बाब म्हणजे, गायकवाड हे फक्त बनियन आणि कमरेला टॉवेल गुंडाळलेल्या थोडक्यात, अर्धनग्न अशा अवस्थेत होते. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे, सदर घटनेचे चित्रीकरण करून ते समाजमाध्यमावरही टाकण्यात आले. सध्या राज्यात 'त्रिसुत्री' भाषेच्या धोरणावरून राजकारण तापलेले असताना, ही घटना म्हणजे विरोधकांच्या 'हातात आयते कोलीत'च मिळाले. ही 'सुवर्णसंधी' समजत त्यांनी विधानभवनात सरकारवर चांगलेच तोंडसुख घेतले. आश्चर्य म्हणजे, मारहाण केल्यानंतर, या गोष्टीचा मला कोणताच पश्चात्ताप होत नाही, अशा मग्रुर भाषेत, गायकवाडांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. खरे तर, या घटनेमुळे विरोधकांना 'आनंदाच्या उकळ्या फुटण्या'ची काहीच गरज नाही. कारण, तुम्ही काही 'धुतल्या तांदळासारखे स्वच्छ' नाहीत. तुम्ही सत्तेवर असताना, एका आमदाराने आंदोलनाच्या नावाखाली चित्रपटगृहात घुसून आपल्या काही समर्थकांसह धुडगूस घातला होता. एका प्रेक्षकाने बाहेर जाण्यास मज्जाव केल्याने, त्याला पत्नी आणि लहान मुलीसमोर धक्काबुक्की केली. याच महाशयांनी आपल्या विरोधात आक्षेपार्ह पोस्ट केली म्हणून, अनंत करमुसे नावाच्या लष्करी जवानाला आपल्या अंगरक्षक आणि पोलिसांकरवी त्याच्या घरातून उचलून आपल्या फार्महाऊसवर आणले. नंतर त्याचे शरीर काळेनिळे पडोत्सर त्याला मारहाण केली. शरीर तंदुरुस्त असल्याने तो वाचला. 'विश्वप्रवक्ते' अशी ओळख असलेल्या 'उबाठा' गटाच्या खासदाराने तर कहरच केला आहे. रोज उठून सकाळी सकाळी शिव्या आणि शापांची लाखोली ते वाहत असतात. काही महिन्यांपूर्वी, आपल्याच सहका–याच्या पत्नीला फोनवर अत्यंत अश्लील भाषेत भ,म, गच्या बाराखडीत यांनी शिवीगाळ केली होती, हे संपूर्ण महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही. विशेष म्हणजे, ते 'मराठी' कुटुंब आहे, हे विसरता कामा नये. मराठी महिलांना, नागरिकांना अत्यंत खालच्या भाषेत टीका करण्याचा संपादक (?) म्हणून मिरवून घेणा–या या महाशयांचा छंदच आहे. सर्वात लाजिरवाणी गोष्ट म्हणजे, आपल्या मामुंच्या (माजी मुख्यमंत्री) विरोधात पोस्ट केली म्हणून, त्यांच्या 'बगलबच्च्यां' नी शर्मा नावाच्या वृध्द नौदल अधिका–यास घरात घुसून मारहाण केली. त्या वृध्दाच्या डोळ्यास गंभीर दुखापत झाली होती. संतापजनक बाब म्हणजे, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी त्यांना मातोश्रीवर बोलावून त्यांचा सत्कार केला. हे कमी की काय म्हणून, वरतून 'भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे' असा आशीर्वाद देत, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थापही मारली. त्या अडीच वर्षांच्या काळात कायदा आणि अधिकारांचा किती आणि कसा गैरवापर केला गेला? याची खुप मोठी यादी तयार होईल. सत्ताधारी काय आणि विरोधक काय, सर्वच कारभारी 'एकाच माळेचे मणी' आहेत. 'एकाला झाकावा आणि दुस–याला' काढावा, असा हा प्रकार आहे.अधिका–यांवर, सर्वसामान्य नागरिकांवर हात उचलणे, शिवीगाळ करणे, फोनवर धमक्या देणे, असे प्रकार याआधी खुप घडले आहेत; आणि या पुढेही घडतच राहतील. 'लोकप्रतिनिधी झालो म्हणजे, हवा तसा धुडगूस घालण्याचा जणू काही परवानाच मिळाला आहे' आणि 'आमचे कोणीही काही वाकडे करू शकत नाही' या अविर्भावात हे 'सफेद कॉलर गुंड' समाजात अगदी बेफाम पणे वावरत असतात. समाजाला खरा धोका सर्वसामान्य गुंडांकडून नाही, तर यांच्याकडूनच जास्त आहे.सत्तेच्या ढेपेला मुंगळ्यासारखे चिकटता यावे, यासाठी आकड्याचे गणित महत्त्वाचे असते. हे गणित पूर्ण होण्यासाठी अंतर्गत 'साटेलोटे' महत्त्वाचे असते. जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी 'यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल' अशी पोकळ घोषणा करून वेळ मारून न्यायची. प्रत्यक्षात काहीच कारवाई होत नसल्याने यांची भीड चेपली जाऊन, काही दिवसांतच पुढील 'कारनामा' करण्यास हे सज्ज होतात. वाईट याचे वाटते की, 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतोय' म्हणूनच हे 'लोकप्रतिनिधी' आहेत की 'गुंड'? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
मोबाईल– ८७६७५९२९८०

# स्वत:च्या देहबोलीवर लक्ष द्या!

**खूप** वेळा आपण इतके स्वमग्न होतो की आपले भान हरपून जाते. लक्ष केंद्रित न झाल्यामुळे अनेक समस्या, संकटे आणि वाईट परिणाम आपल्याला जीवनात सतत भोगावे लागतात. मन सतत विचारमग्न असणे खूपच धोकादायक आहे. विचार थांबवून 'शून्य विचारावस्था' गाठणे हे खरंच एक मानसिक व्यायाम आहे. मनाची एकाग्रता साधण्यासाठी प्राणायाम, ध्यानधारणा यांसारख्या अनेक पद्धती विकसित झाल्या आहेत आणि त्या खरोखरच लाभदायक ठरतात. त्याचबरोबर, आपल्या देहबोलीवर लक्ष देणे ही देखील एकाग्रता साधण्याचा व व्यक्तिमत्त्व विकासाचा एक सुंदर पर्याय आहे.आपण विविध माध्यमांद्वारे आपले विचार, भावना आणि प्रतिक्रिया व्यक्त करत असतो. यासाठी भाषा म्हणजेच मौखिक संवाद सर्वाधिक वापरली जाते. मात्र, आपल्या देहबोलीतूनही आपण समोरच्याला अनेक गोष्टी सांगत असतो. खूप वेळा लक्ष विचलित झाल्यास आपण तोंडाने काही बोलतो आणि देहबोली मात्र वेगळीच असते. उदाहरणार्थ, एखाद्याचे गुणगौरव करताना आपण म्हणतो, ''हे पाहून मला खूप आनंद झाला!'' पण त्या वेळी चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत नसेल, तर समोरच्याला आपले बोलणे नाटकी वाटते. आपला खोटेपणा देहबोलीतून उघड होतो. मातृभाषेतून बोलणे आपण सभोवतालच्या लोकांचे ऐकून नकळत शिकत जातो. त्याचप्रमाणे देहबोली आपण अनुकरणातून शिकतो. त्यात सततच्या वापरातून काही चुकीच्या सवयी तयार झालेल्या असतात, तर काही देहबोली आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिकूल असते. त्यामुळे देहबोली जाणीवपूर्वक शिकून घेतली पाहिजे. डोळे हे नेहमी आपले व्यक्तिमत्त्व प्रकट करत असतात. समोरच्याच्या डोळ्यांत खोलवर पाहिल्यानंतर त्याचा स्वभाव, भावना आणि खोटेपणा ओळखता येतो. त्यामुळे आपण लोकांसमोर किंवा बोलताना डोळे मिचकावणे, भुवया उडवणे टाळले पाहिजे. डोळ्यांमधून आपल्या सुसंस्कृतपणाचे दर्शन घडते. त्यामुळे समूहामध्ये वावरताना डोळ्यांचा सावधपणे वापर केला पाहिजे.समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांत डोळे घालून बोलल्यास आपला आत्मविश्वास दिसून येतो. चेहरा नेहमी प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला पाहिजे. कारण आपली प्राथमिक ओळख म्हणजे आपला चेहरा असतो. सतत चेहऱ्यावर तणाव दिसल्यास लोक आपल्याजवळ येण्याचे टाळतात.चेहऱ्यावरील हास्य, प्रेम, आपुलकी आणि करुणा हे भाव खऱ्या अर्थाने मनापासून व हृदयापासून उमटले पाहिजेत. ते जाणीवपूर्वकही विकसित करता येतात आणि सहजतेनेही निर्माण होऊ शकतात. त्यासाठी चेहऱ्यावर योग्य भाव जाणीवपूर्वक निर्माण करता आले पाहिजेत. चालताना आणि बोलताना हातांचा वापर आपण करत असतो. हातवारे करताना आपल्यातील आत्मविश्वास,रखडपणा आणि निर्धार प्रकट करण्यासाठी हातांचा ताकतीने वापर केला पाहिजे. बोलताना आपल्या मनगटातील जोर दिसला पाहिजे. हातवारे नेबळटपणे करणाऱ्यांचे लोक सहसा गांभीर्याने ऐकत नाहीत.कधी काही गर्विष्ठ लोक आपल्या बोटातील सोन्याच्या अंगठ्या दाखवण्यासाठी मुद्दाम हातवारे करतात. अशा नाटकीपणाने हातवारे करणाऱ्यांचे खोटेपण हुशार माणसांना लगेच समजते.शरीराच्या प्रत्येक अवयवाचा उपयोग आपण स्वतःला समाजासमोर प्रकट करत असताना करतो. त्यामुळे त्या शरीरभागांचा वापर करताना सजगता, नैसर्गिकता आणि कल्पकता ठेवणे महत्त्वाचे असते. शेवटी, ''ये जो पब्लिक है, सब जानती है!'' या गीताच्या ओळीप्रमाणे लोक आपल्याला पूर्ण ओळखत असतात. म्हणून खोटा आव आणून उगाच छाती फुगवून चालणे टाळले पाहिजे. चेहरा नेहमी गंभीर, उग्र किंवा रागीट ठेवणे टाळले पाहिजे. समोरच्याचे मन:पूर्वक ऐकले पाहिजे आणि त्यावर नैसर्गिक प्रतिसाद दिला पाहिजे. समोरच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणे किंवा गांभीर्य न राखणे यातून आपला बेजबाबदारपणा प्रकट होतो. आपल्या देहबोलीवर लक्ष देणे हे केवळ संवाद कौशल्याचा भाग नसून एक अत्यंत महत्त्वाचे आत्मभान आहे. हे केवळ इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी नसून, स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आवश्यक आहे. आपण कोण आहोत, काय अनुभवतो आणि जगाशी कसे वागतो हे सर्व आपल्या देहबोलीतून उमटत असते.



**किशोर जाधव,**
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

## आसावरी उत्तरेश्वर घुटे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत दुहेरी यश

आरंभ मराठी | धाराशिव



दारफळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी कुमारी आसावरी उत्तरेश्वर घुटे ही इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती धारक झाली आहे. यंदाच्या वर्षी तिने दोन शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करून विशेष यश संपादन केले आहे. तिने जिल्हा गुणवत्ता यादीत जनरल मधून ६६ वे स्थान मिळवले आहे. तिने केवळ आठवी राज्य शिष्यवृत्ती परीक्षाच नव्हे, तर राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा सुद्धा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. *तिच्या या दुहेरी यशामुळे संपूर्ण शाळा, गाव आणि तालुक्याचा गौरव वाढला आहे. शाळेचे मुख्याध्यापक बिभीषण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या यशस्वी प्रवासात तिला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांमध्ये शिवाजी मोरे सर, विजय पाटील सर, श्रीमती भाग्यश्री हुगे मॅडम प्रदीप बोरके सर यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. आसावरीच्या या उज्वल यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष भैरवनाथ जाधव, ग्रामपंचायत सरपंच रवींद्र दादा जाधव, उपाध्यक्ष अंगद घुटे, समितीचे सर्व सदस्य तसेच पोलीस पाटील सचिन जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष धर्मराज जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

## अजित लाकाळ मित्र परिवाराच्या वतीने अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**पळसप** –गुरू पौर्णिमेचे औचित्य साधून पळसप येथील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शिवसेना तालुका प्रमुख (धाराशिव) अजित लाकाळ मित्र परिवाराच्या वतीने शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद आणि इतर संस्था मधील प्राथमिक माध्यमिक विद्यार्थ्यांना शाळेकडून मोफत गणवेश दिला जातो. मात्र अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गणवेश दिले जात नाहीत. याचाच विचार करून अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, गणवेशामुळे त्यांच्यात शिस्त निर्माण व्हावी, गरीब श्रीमंत विद्यार्थ्यांमध्ये समानता दिसावी याचा विचार करून अजित लाकाळ मित्र परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. या दरम्यान शिवसेना तालुका प्रमुख अजित लाकाळ, माजी उपसरपंच प्रमोद लाकाळ, ग्रा.सदस्य बबन निकम , गावातील संजय लाकाळ, प्रकाश फुटाणे, सरताज पटेल, भूषण कथीलकुटे , सुनील माळी, धनंजय साळुंखे , अंगणवाडी पर्यवेक्षिका वसुधा कुलकर्णी तसेच अंगणवाडीतील कर्मचारी श्रीमती मंजुषा लाकाळ, प्रमिला साबळे, श्रीमती भोसले यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# बाल कुपोषण नियंत्रण काळाची गरज..!

**राज्यातील** मेळघाट आणि गडचिरोली जिल्ह्याच्या दुर्गम भागातील बालकुपोषणाची तीव्रता गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. त्यात शहरी भागात आढळणाऱ्या बाल कुपोषणाने त्यात भर घातली आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील कुपोषण कमी करण्याच्या उपाययोजनेबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता.त्यावरील लेखी उत्तरात महिला व बालविकास विभागाच्या वतीने कुपोषित बालकांची आकडेवारी उघडीस आली. त्यानुसार राज्यात सर्वाधिक तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात असल्याचे धक्कादायक माहिती उघड झाली.या आकडेवारीनुसार राज्यात एक लाख अठ्ठ्याशी हजार चारशे त्रेचाळीस कुपोषित बालके आहेत.त्यापैकी तीस हजार आठशे बालके तीव्र कुपोषित श्रेणीत आहे. तर एक लाख एक्कावन हजार सहाशे त्रेचाळीस बालके मध्यम कुपोषण श्रेणीत आहे. तीव्र व मध्यम कुपोषित बालकांच्या संख्येत राज्यातील मुंबई उपनगर,नाशिक, पुणे, नागपूर आणि धुळे जिल्ह्यातील बालकांचे प्रमाण अधिक आढळून आले आहे. ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणाच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होण्याऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे. खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम करणाऱ्या लाखो कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही. त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड,वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरचा ठरतो. आज सकस पोषण आहाराच्या अभावामुळे कुपोषणाची तीव्रता वाढत आहे. बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस' , 'मिशन पोषण २.०', 'सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे. राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा. राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे. बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे. कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून पुनर्वसन कोणीही गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रणासाठी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.





**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

## जिल्ह्यातील ३१ महत्वाकांक्षी प्रकल्पांवर भर; 'महास्ट्राईड' दरडोई उत्पन्न वाढवणार

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा विश्वास

आरंभ मराठी | धाराशिव



'मित्र' संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकार आणि जागतिक बँकेच्या सहकार्याने महास्ट्राईड महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत नुकतीच एक महत्त्वाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत महास्ट्राईडची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. महास्ट्राईड या प्रकल्पाचा उद्देश हा प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक गरजा आणि बलस्थान लक्षात घेऊन विशेष विकास आराखडे तयार करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, असा आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यांच्या विकासाला दिशा मिळेल आणि महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीत प्रत्येक जिल्ह्याचा सक्रिय सहभाग सुनिश्चित होईल, असा विश्वास आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.महास्ट्राइड प्रकल्पाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला गती देणाऱ्या ३१ प्रकल्पांवर भर देण्याचे ठरले आहे.जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न १,९०,३८३ रूपये असून सकल राज्यांतर्गत उत्पन्नात जिल्ह्याचा वाटा १% आहे. २०२७ पर्यंत तो तेव्हाच्या उत्पन्नाच्या १.२% करण्याचे उद्दीष्ट असुन देशाच्या व राज्याच्या विकासासोबतच जिल्हा देखील मागे रहायला नको यासाठी प्रभावीपणे काम सुरू असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून विकास कामांची पाहणी

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी शुक्रवारी (दि.११) धाराशिव व तुळजापूर तालुक्याचा दौरा करून कृषी विभाग, वन विभाग, आत्मा व पशुसंवर्धन विभागामार्फत सुरू असलेल्या विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये मायरान यांच्या मुरगास बेलर युनिटची, तसेच 'मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प ()' अंतर्गत 'आई लक्ष्मी फार्म प्रोड्यूसर कंपनी'च्या क्लिनिंग–ग्रेडिंग सेंटर व ऑईल एक्सट्रॅक्शन प्रकल्पाची पाहणी करण्यात आली.तसेच श्री.बिभीषण माने (बोरणद वाडी) यांच्या शेततळ्याचे व फळबाग लागवडीचे निरीक्षण करण्यात आले. तीर्थ खुर्द येथे 'अहिल्यादेवी शेळी व मेंढी महासंघा'ची तपासणी करण्यात आली. याशिवाय, कृषि विभागामार्फत योजनेअंतर्गत लाभ मिळालेल्या रमेश खताळ (बारुळ) यांच्या तुती लागवड प्रक्षेत्रास भेट देऊन नव्याने तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. या दौऱ्यात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने तसेच वन विभाग, पशुसंवर्धन व आत्मा विभागाचे अधिकारी,तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विभागाचे इतर अधिकारी आणि स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

## भाजपा राज्य परिषदेवर निवड झाल्याबद्दल बाळासाहेब क्षीरसागर यांचा सत्कार

आरंभ मराठी | भूम

भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषद सदस्य पदी पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब क्षिरसागर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा भूम तालुका भाजपच्या वतीने सत्कार करण्यात आला. भाजपाचे निष्ठावंत, अधिकारी, नेते मंडळींची राज्य परिषद सदस्य पदी निवड नुकतीच करण्यात आली असून, परंडा विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष असलेले बाळासाहेब क्षिरसागर यांचीही निवड झाल्याने त्यांचा शुक्रवार दिनांक ११ जुलै रोजी तालुका भाजपच्या वतीने पक्ष कार्यालयात सत्कार करण्यात आला. बाळासाहेब क्षिरसागर हे गेल्या ३५ वर्षापासून भाजपशी एकनिष्ठ राहून, पक्षाच्या ध्येय धोरणानुसार पक्ष संघटनात्मक काम करत आहेत. त्यांना पक्षश्रेष्ठींनी जवळपास आठ राज्यात देखील महत्त्वपूर्ण जबाबदारी गेल्या काही वर्षांपूर्वी दिलेली होती. एकनिष्ठपणा, अनुभव विचारात घेता आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षश्रेष्ठीनी राज्य परिषद सदस्य पदी त्यांची निवड करून मोठी जबाबदारी दिली आहे. याचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पक्षाला मोठा आधार मिळणार आहे. सत्कार प्रसंगी तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, महादेव वडेकर, शहर अध्यक्ष बाबासाहेब वीर, आबासाहेब मस्कर, हेमंत देशमुख , प्रदिप साठे, संदिप खामकर, सिद्धार्थ जाधव, आकाश शेटे, सुबराव शिंदे, विधीज्ञ संजय शाळू, चंद्रकांत गवळी, शंकर खामकर, राम भारती, सौ विद्या खामकर, सौ उषाताई आसलकर, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष दिलीप गाढवे, दीपक खराडे, जयेंद्र मैंदरगे उपस्थित होते.

## पुजारी नगरचा राजा गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी पवार,उपाध्यक्ष कांबळे

आरंभ मराठी | तुळजापूर





पुजारी नगर फाऊंडेशनच्या माध्यमातून गतवर्षीपासून सार्वजनिक गणपती उत्सवाची सुरुवात करण्यात आली असून, यंदा गणेश मंडळ अध्यक्षपदी श्रावण पवार यांची निवड सर्वांनमते करण्यात आली. पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वांनुमते मंडळाच्या अध्यक्षपदी श्रावण पवार, उपाध्यक्षपदी प्रतिक कांबळे,सिद्धीराज कोळेकर, खजिनदारपदी ॲड.राज राठोड, नागनाथ पुजारी, सचिवपदी महेश पुजारी, सहसचिवपदी प्रतिक मोरे, उत्सव समिती प्रमुख कुणाल गायकवाड, युग अग्रवाल,गणपती विसर्जन प्रमुखपदी रुतेश कवडे यांची एकमताने निवड करण्यात आली.याप्रसंगी सोसायटीचे जेष्ठ सदस्य हरिदास नाईकवाडी,हणमंत कदम,उमाजी गायकवाड, विठ्ठल म्हेत्रे, मनोज चौगुले, तानाजी म्हेत्रे,शिवाजी चव्हाण,बाळासाहेब पवार,किसन क्षीरसागर, लिंबाजी पुजारी,विठ्ठल नाईक,प्रभाकर नलावडे, सिद्धेश्वर इंगोले, विशाल शिंदे,देविदास पुजारी, आदर्श कांबळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

शनिवार, दि.12 जुलै 2025

# उमरगा तालुक्यातील ८० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षण सोडत जाहीर; नव्या राजकीय समीकरणांना गती

## महिलांना मोठी संधी,तरुणांना आव्हान;अनेक गावांमध्ये नव्या नेतृत्वाच्या चर्चांना सुरुवात

मोहन जाधव | आरंभ मराठी

उमरगाः तालुक्यातील ८० ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सन २०२५ ते २०३० या कालावधीतील आरक्षण सोडतीचा कार्यक्रम गुरुवारी (ता. १० जुलै) रोजी उमरगा शहरातील अंतूबळी सभागृहात पार पडला. उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पडली. या आरक्षण सोडतीनुसार, तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीपैकी अनुसूचित जातींसाठी १३, अनुसूचित जमातींसाठी २, नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी २२ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४३ ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या आहेत. यात महिलांसाठी स्वतंत्रपणे मोठ्या प्रमाणावर आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. काही ठिकाणी अनुसूचित जाती व जमातीतील महिला, तर काही ठिकाणी सर्वसाधारण व मागास प्रवर्गातील महिलांसाठी सरपंच पद राखीव ठेवण्यात आले आहे.



खुला प्रवर्ग (महिलांसाठी २१) :– काळानिंबाळा, नारंगवाडी, नाईचाकूर, गुगळगाव, जकेकूरवाडी, कोरेगाववाडी, हिप्परगाराव, व्हंताळ, मातोळा, पळसगाव, दाळिंब, कडदोरा, कराळी, हंद्राळ, दावलमलिकवाडी, अंबरनगर, जगदाळवाडी, थोरलीवाडी, नाईकनगर (सु), नाईकनगर (मु), भगतवाडी.

सदर आरक्षण यादी प्रसिद्ध होताच अनेक गावांत पुढच्या निवडणुकीसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. नव्या दमाचे तरुण, महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या गटांच्या बैठका सुरू झाल्या आहेत. काही ठिकाणी सत्ताधारी गटांना धक्का बसला असून, नव्या नेतृत्वाला संधी मिळणार का? याची जोरदार चर्चा रंगली आहे. महिलांना ५० टक्के मिळालेल्या आरक्षणामुळे अनेक महिलांमध्ये नेतृत्व विकसित करण्याची संधी निर्माण झाली आहे. तरुण वर्गही आता राजकारणात सक्रियपणे सहभागी होऊ लागला आहे. ग्रामविकासात नव्या पिढीचा सहभाग वाढावा यासाठी ही आरक्षण योजना महत्त्वाची ठरणार असल्याचे मत ग्रामपंचायत कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. यापुढे या आरक्षणाच्या आधारे गावपातळीवर नवा राजकीय नकाशा कसा रंगतो, कोणते नवे चेहरे पुढे येतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### महिलांसाठी सरपंच पदाच्या राखीव जागा

० पैकी महिलांसाठी ४० जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये अनुसूचित जाती महिलांसाठी ७ जागा, अनुसूचित जमाती महिलेसाठी १ जागा, नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी ११ जागा आणि सर्वसाधारण महिलांसाठी २१ जागा आरक्षित आहेत. असे एकूण मिळून ४० जागांवरती महिला सरपंच होऊन गावचा कारभार सांभाळणार आहेत निश्चित झाले आहे.

अनुसूचित जमाती (एकूण २) :– जवळगाबेट, कोळसुर (गुं).

अनुसूचित जमाती (महिलांसाठी १) :– कोळसुर (गुं).

नागरिकांचा मागास प्रवर्ग (एकूण २२) :– आनंदनगर, कोरेगाव, एकोंडी (ज), मुरळी, भुसणी/भुसणीवाडी, सावळसुर, कोथळी, तलमोड, मळगीवाडी, कलदेव निंबाळा, समुद्राळ, सांगवी (भि), वागदरी, कदेर, कसगी, धाकटीवाडी, औराद, तुगांव, येणेगुर, एकुरगा, सुपतगाव, डिग्गी.

### ८प्रवर्गनिहाय आरक्षित ग्रामपंचायती...

अनुसूचित जाती (एकूण १३) :– आष्टा (ज), बेळंब, गुरुवाडी/ चंडकाळ, बाबळसुर, त्रिकोळी, दाबका, कदमापूर/दुधनाळ, चिंचोली (ज), कंटेकुर, जकेकुर, पेठसांगवी, येळी, चिंचोली (भु).

अनुसूचित जाती (महिलांसाठी ७) :– आष्टा (ज), गुरुवाडी/ चंडकाळ, जकेकूर, बाबळसूर, येळी, पेठसांगवी, चिंचोली (भु).

नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिलांसाठी ११) :– कलदेव निंबाळा, सांगवी (भि), कदेर, कसगी, समुद्राळ, धाकटीवाडी, औराद, तुगाव, एकुरगा, मळगीवाडी, एकोंडी (ज).

खुला प्रवर्ग (एकूण ४३) :– कोराळ, नागराळ (गु), भगतवाडी, नाईचाकूर, कराळी, गुंजोटी, चिंचकोट, जकेकुरवाडी, बेडगा, मातोळा, हंद्राळ, नारंगवाडी, केसरजवळगा, आलूर, माडज, मळगी, वरनाळवाडी, सुंदरवाडी, महालिंगरायवाडी, दावलमलिकवाडी, अंबरनगर, तुरोरी, हिप्परगाराव, थोरलीवाडी, रामपूर, गणेशनगर, कोळसुर (क), बलसुर, दगडधानोरा, जगदाळवाडी, कवठा, कुन्हाळी, बोरी, काळानिंबाळा, दाळिंब, मुळज, नाईकनगर (मु), गुगळगाव, पळसगाव, व्हंताळ, नाईकनगर (सु), कडदोरा, कोरेगाववाडी.

# शिष्यवृत्ती परीक्षेत मराठी कन्या शाळेतील चार विद्यार्थी चमकले



आरंभ मराठी | धाराशिव

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शहरातील समता सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मराठी कन्या प्राथमिक शाळेतील चार विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले आहेत.शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये मराठी कन्या शाळेतील शेटे गणेश भालचंद्र (७९.३३ %), केसकर शिवम महेश (७६.६६%), जाधव तेजश्री महेश (७५.३३%), आचार्य राज दिपक (७१.३३%) गुण मिळवून गुणवत्ता यादीत समाविष्ट झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष एन.आर. सोनार, उपाध्यक्ष श्री एडके सर, सचिव श्री वाघमोडे सर, सहसचिव श्री कुंभार सर, कोषाध्यक्ष श्री थोरात सर, संचालक श्री डोके सर, श्री माळी सर, श्री वाघमोडे सर, श्री टेळे, श्री. वेदपाठक, श्री पावले यांनी गुणवंतांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही अभिनंदन करण्यात आले. मुख्याध्यापक व सर्व शिक्षक कर्मचारी यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले.

# तेर येथे धनगर समाजाची परज मिरवणूक; श्रीमद भागवत कथेची कीर्तन महाप्रसादाने गुरूपौर्णिमा साजरी

आरंभ मराठी | तेर



धाराशिव तालुक्यातील तेर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त धनगर समाजाच्या वतीने श्री विठ्ठल बिरुदेव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणपती चौकातून विठ्ठल बिरूदेवाच्या नावानं चांगभल जयघोष करीत धनगर समाजाचे पारंपारिक वाद्याच्या तालावर खेळ खेळीत, भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत परजची मिरवणूक काढण्यात आली. तर बाळासाहेब आचार्य यांच्या निवासस्थानी चालू असलेल्या श्रीमद भागवत कथेची सांगताही किर्तनासह महाप्रसादाने झाली. गुरूवारी (दि.१०) गुरूपोर्णिमेला धनगर समाज बाधवांच्या वतीने पारंपारिक वाद्यांच्या तालावर विविध प्रकारच्या कलाविष्कारांचे सादरीकरण करीत, पाऊल खेळत विठ्ठल बिरुदेवाच्या नावन चांगभलच्या जयघोषासह भंडाऱ्याची मुक्त उधळण करत छत्रीची मिरवणूक काढण्यात आली. ही परज मिरवणूक गणपती चौक, जुनी ग्रामपंचायत, पानभर वेस, पेठ मार्गे मोठ्या उत्साहात विठ्ठल बिरूदेव मंदिरात पोहोचली. याठिकाणी श्री विठ्ठल बिरुदेव मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भागवत भक्ते, फुलचंद पसारे, तानाजी पसारे, गोरोबा पाडूळे, दत्ता भक्ते, अनिल टेळे, नवनाथ पसारे, इर्शाद मुलानी, हनुमंत पसारे, राजाभाऊ पसारे, दत्ता भक्ते, दादा पसारे ,गजेंद्र सौदागर, उमेश सौदागर, श्याम गायके, सिद्धेश्वर पसारे, काका पसारे, यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान ह.भ.प. बाळासाहेब आचार्य यांच्या निवासस्थानी गेल्या ७ दिवसापासून चालू असलेल्या श्रीमद भागवत कथा सप्ताह सोहळ्याची सांगता किर्तनाने व महाप्रसादाने करण्यात आली. या उत्सवाच्या निमित्ताने तेर नगरीत धार्मिक वातावरण तयार झाले होते.

# तुळजापुरात मोकाट जनावरांचा पुन्हा उच्छाद

## जनावरे कोंडवाड्यात सोडण्याची मागणी



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील अनेक भागात मोकाट जनावरांचा उच्छाद सुरू असून यामुळे अनेकांना जखमी व्हावे लागत आहे. या जनावरांना पकडून कोंडवाड्यात सोडण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तुळजापूर शहरात अनेक मोकाट जनावरे गेल्या काही दिवसांपासून फिरत आहेत. तत्पूर्वी शारदीय नवरात्र महोत्सवात ही मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात सोडण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. मात्र नवरात्रोत्सवानंतर ही जनावरे पकडून कोंडवाड्यात सोडण्याची मोहीम बासनात गुंडाळली गेली असून, यामुळे पुन्हा शहरात मोठ्या प्रमाणावर मोकाट जाणारे फिरताना दिसून येत आहेत. अनेक गल्लीबोळामध्ये तसेच रस्त्यावर ही जनावरे ठाण मांडत असून महिला, शाळकरी मुले तसेच वृद्ध नागरिकांना या जनावरापासून मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेकदा ही जनावरे हिंसक रूप धारण करत असून त्यामुळे नागरिकांना जखमा होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर व्यक्त होत आहे. याबाबत नगरपरिषदेने तात्काळ कारवाई करून ही जनावरे कोंडवाड्यात सोडण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# सावरगाव प्रशालेचे शिष्यवृत्ती परीक्षेतील यश




आरंभ मराठी | धाराशिव

दि.९ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली.यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव ता.तुळजापूर येथील इ ८ वी चे श्रावणी कानिफनाथ माळी, आदिती परमेश्वर पाटील,पृथ्वीराज महादेव कुंभार व समृध्दी माणिक करंडे हे ४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले.त्याबद्दल आज त्यांचा गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाळेत फेटा, पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन मुख्याध्यापक श्री रमाकांत गुरव व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अतुल पवार, सदस्य रामेश्वर माळी, रंगनाथ डोलारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.सदर विद्यार्थ्यांना श्री गणपत होनमुटे, श्री धनाजी चौरे, श्री नितिन गायकवाड, श्रीम . भारती तुपेरे, श्री बापू काळे यांचे मार्गदर्शन लाभले.याप्रसंगी गोकूळ शिंदे,सत्यवान सुरवसे शाळेतील शिक्षक श्री शुभकिरण मोहिते, श्री अकबर मुलाणी,श्री. आनंद राऊत, श्रीम. सूर्यवंशी पी एन, श्री मैनाबाई पौळ, श्री मल्लिनाथ मडिवळे, महेश दरेकर,पालक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. सावरगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य श्री राजकुमार पाटील, पांडुरंग हागरे यांनी शाळेत येऊन यशस्वी विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक यांचे या यशाबद्दल अभिनंदन केले.

# तेर येथील महावितरणचे तंत्रज्ञ क्षीरसागर यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे तंत्रज्ञ म्हणून बाबासाहेब क्षिरसागर तेर येथे रूजू झाल्याने त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी महावितरणचे सहा.कार्यकारी अभियंता अमरनाथ स्वामी, ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी, अजीत कदम, किशोर काळे, नामदेव कांबळे, गणेश फंड, बाळासाहेब सौदागर, किरण केदार, सतीश अंकूश, मुरलीधर गाडेकर, नवनाथ बिराजदार यांच्यासह महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते.




# धम्मदेसनाचा लाभ घ्या; पुज्य भंते सुमेध नागसेन यांचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव




बौद्ध धम्मात वर्षावासाला अनन्य असे महत्त्व आहे. घाटंग्री गडदेवदरी परिसरात तगर भुमी जेतवन बुध्द विहाराची निर्मिती होत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वर्षावास महोत्सव साजरा केला जात असून, या महोत्सवात धम्मदेसनाचा कार्यक्रम रविवारी (दि.१३) आयोजित केला असून, प्रसिद्धी पत्रकाचे प्रकाशन पुज्य भंते सुमेध नागसेन यांचे हस्ते राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या कार्यालयात करण्यात आले. या महोत्सवात पुज्य भिक्खू दयानंद थेरो, भिक्खु धम्मशील हेरो भिक्खू पर्यावंस, तर प्रमुख धम्मदेसना पूज्यनीय भिक्खू डॉ.उपगुप्त महाथेरो यांची धम्मदेसना राहणार आहे. या महोत्सवात सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी भंते सुमेध नागसेन, धनंजय वाघमारे, बलभीम कांबळे, बापु कुचेकर, गणेश वाघमारे, संपतराव शिंदे, नवनाथ वाघमारे, दिलीप वाघमारे, श्री धावारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# आझाद हिंद नेचर आर्मीच्या पर्यावरण चळवळीला एनसीसी ताकद देईल

## कमांडिंग ऑफिसर कर्नल मानस दीक्षित यांचे प्रतिपादन

आरंभ मराठी | कोल्हापूर



''कोल्हापूरचा पारा ४१३६ करणार'' या आझाद हिंद नेचर आर्मीच्या पर्यावरण चळवळीला पाच महाराष्ट्र बटालियन ताकद देईल, पाच महाराष्ट्र बटालियनचे सर्व एनसीसी विद्यार्थी वर्षभरात जास्तीत जास्त वृक्षारोपण करून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सज्ज राहतील, असे प्रतिपादन पाच महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मानस दीक्षित यांनी केले. कोल्हापुरात आझाद हिंद नेचर आर्मीच्या वतीने कोल्हापूर ग्रुप एनसीसी भवन येथे वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आझाद हिंद नेचर आर्मीचे अध्यक्ष राहुल मगदूम होते.यावेळी पाच महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे ,कोल्हापूर एनसीसी ग्रुपचे ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई, आझाद हिंद नेचर आर्मीचे अध्यक्ष राहुल मगदूम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कर्नल दीक्षित म्हणाले, तापमान वाढ रोखण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करणे आवश्यक आहे.प्रत्येक भारतीयाने खारीचा वाटा उचलून काम करावे.यामधून जगाला पर्यावरण विषयी चांगला संदेश आपण देवू शकतो. कोल्हापूर एनसीसी ग्रुपचे ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई म्हणाले, प्रत्येकाने दररोजच्या वापरात प्लास्टिक टाळून प्रदूषण दूर करावे.आपल्या घराच्या आजूबाजूचा परिसर निसर्गरम्य करावा.यावेळी कार्यक्रमास एनसीसीचे प्रशासन ट्रेनिंग जेसीओ सुभेदार मेजर सुरेंद्र भोसले, आझाद हिंद नेचर आर्मीचे, अमर भोसले, परितोष उरकुडे, निलेश नाडगोंडा, शिवाजी विद्यापीठचे उद्यान अधीक्षक अभिजीत जाधव, एनसीसीचे सुभेदार सचिन पाटील, सुभेदार राजाराम आढाव, जीसीआय अपूर्वा शेलार एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट जितेंद्र भरम गोंडा,फर्स्ट ऑफिसर अँथनी डिसोजा, फर्स्ट ऑफिसर अनील सकरे,थर्ड ऑफिसर विजय शहापुरे, थर्ड ऑफिसर शंकर महाले बटालियनचा पीआय स्टाफ यांच्यासह एनसीसी विद्यार्थी, कार्यालयीन स्टाफ आदी उपस्थित होते.

# नेहमी स्वत:च्या क्षेत्रातील शिखर गाठा

## डॉ.ऋत्विक जयकर यांचे आवाहन



आरंभ मराठी | सोलापूर

''तुम्ही कोणतेही काम करा, पण नेहमी त्यामध्ये उच्चतम दर्जा गाठण्याचा प्रयत्न करा. आपण करत असलेल्या कार्यात नेहमीच त्या क्षेत्रातील शिखराकडे लक्ष ठेवले पाहिजे. त्यासाठी सफाईदारपणा, प्रामाणिक मेहनत, आणि सातत्य महत्त्वाचे आहे,'' असे विचार डॉ. ऋत्विक जयकर यांनी व्यक्त केले.

डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता पदावर नियुक्ती झाल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमात डॉ. जयकर यांचा त्यांच्या प्रियजनांकडून गौरव करण्यात आला.कार्यक्रमास जॉगर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकांत बोराडे, डॉ. अतिश बोराडे, माऊली महाविद्यालय वडाळा येथील प्रा. परमेश्वर हटकर, लेखक किशोर जाधव, डॉ. विजयकुमार कोळी, संतोष जगताप, मिनेश बोराडे, बाळासाहेब रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. सत्कारास उत्तर देताना डॉ. जयकर यांनी आपल्या तीस वर्षांच्या वैद्यकीय सेवाभराच्या प्रवासाचा आढावा घेतला. ''माझ्यासारखा मागास समाजातील व्यक्ती आज या पदावर पोहोचू शकली, याचे संपूर्ण श्रेय छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या महामानवांच्या कार्याला जाते. त्यांच्या धोरणांचा हा परिपाक आहे.मी विद्यार्थी दशेपासून गुणवत्तेवर लक्ष केंद्रित केले. आई–वडिलांनी दिलेल्या सुसंस्कारांबरोबरच शिक्षणातील प्रत्येक टप्प्यावर मी नेहमी सर्वात पुढे राहण्याचा प्रयत्न केला.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे सेवेत रुजू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहिलो. माझ्या आजवरच्या कामाची पोचपावती म्हणून शासनाने मला अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. या पदाला पूर्ण न्याय देत उत्कृष्ट प्रशासन आणि सेवा देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन,'' असे त्यांनी सांगितले.यावेळी श्रीकांत बोराडे, डॉ. अतिश बोराडे, प्रा. परमेश्वर हटकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्वप्निल डोलारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भिकाजी होणकसे, अमित धनवडे, रमाकांत मोरे, शशिकांत रणदिवे,



# धुक्यात झाकोळली तुळजापूर नगरी

धाराशिव जिल्ह्याला पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही भागात ढग दाटून येत असले तरी पाऊस पडत नाही. तुळजापूर शहरावर गुरुवारी पहाटे धुक्याची चादर पसरली होती.आरंभ मराठीचे प्रतिनिधी सूरज बागल यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून टिपलेले छायाचित्र.

# पवनचक्कीत भरडला जातोय वाशी तालुक्यातील शेतकरी

## तांदूळवाडीत लाठीचार्ज, वाशीत उपोषण तरीही शेतकऱ्यांना न्याय मिळेना: विकासाचे प्रकल्प बळीराजाच्या मुळावर



### पवनचक्कीचा वाशी पॅटर्न भाग – १

विक्रांत उंदरे | आरंभ मराठी

वाशी – बालघाटच्या डोंगररांगेत निसर्गाच्या कुशीत वसलेल्या वाशी तालुक्यात पवनचक्कीमधून ऊर्जा निर्मिती हे विकासाचे आधुनिक मॉडेल २०२२ –२३ मध्ये आले. भौगोलिकदृष्ट्या उंचीवर असलेल्या या तालुक्यात पवन ऊर्जा निर्मितीसाठी अनुकूल वातावरण असल्याने या तालुक्यात पवनचक्की ऊर्जा निर्मितीत रस दाखवत मोठमोठ्या कंपन्यांनी हजारो कोटीची गुंतवणूक आणली. विकासाच्या या मॉडेलचे तालुकावासीयांना सुरुवातीच्या काळात साईडइफेक्ट जाणवले नाहीत. पण आता मात्र जाणवायला लागले आहेत.
एजंटाकडून कमी पैशात झालेले जमिनीचे भाडेकरार, शेतकऱ्यांची होत असलेली फसवनुक, शेतकऱ्यांवर लाठीमार, वाढत असलेली गुंडगिरी, मिळत नसलेली नुकसानभरपाई, होत असलेले खोटे दस्तएवेज यामुळे काही नकारात्मक साईड इफेक्ट प्रखरतेने जाणवायला लागले आहेत. तांदूळवाडी येथील शेतकरी लाठीचार्ज आणि वाशी तहसील कार्यालयासमोर उपोषणा नंतर पवनचक्की प्रकरणाची गंभीरता समोर आली होती. पवनचक्की विद्युत वाहिनी मनोरा आणि तारांच्या मावेजामुळे शेतकऱ्याने काम अडवल्यामुळे शेतकऱ्यांवर पोलिसांकडून अमानुष लाठीमार करण्यात आला होता. या गंभीर प्रकाराबाबत आमदार कैलास पाटील यांनी विधिमंडळात लक्षवेधी उपस्थित करून शेतकऱ्यांची व्यथा मांडत कारवाईची मागणी केली. यावेळी त्यांनी बोगस दस्तबाबत सभागृहाला माहिती दिली. त्यानंतर पवनचक्की प्रकरणाची गंभीरता महाराष्ट्रासमोर आली होती. यासह मावेजा मिळण्याबाबत वाशी तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी उपोषण केले होते मात्र त्यांना अद्याप मावेजा मिळाला नाही.

### पवनस्तंभ उभारणीसाठी शेतकऱ्यांना अवास्तव आश्वासने

पवनस्तंभ उभारणीकरिता सात एकर जमीनिचा करार पवनचक्की कंपनीकडून केला जातो. पवनस्तंभ उभारणीसाठी इच्छुक शेतकऱ्यांचे लोकेशन मिळण्यासाठी डेव्हलपर कंपन्यांच्या एजंटाकडून शेतकऱ्यांना अपुरे ज्ञान आणि कराराची पुरेशी कायदेशीर माहिती नसण्याचा गैरफायदा घेत अवाजवी तोंडी आश्वासने देऊन जमिनीचे नोंदणीकृत करारपत्र केले जातात. लोकेशन उभा करेपर्यन्त शेतकऱ्यांना डेव्हलपरकडून थोपटून ठेवले जाते व काम पूर्ण झाल्यानंतर सदरील लोकेशन डेव्हलपर कडून पवनचक्की कंपनिकडे हस्तांतरित होते. मात्र शेतकऱ्यांना दिलेले शब्द पाळले नसल्याच्या कारणांवरून शेतकरी व पवनचक्की कंपनीचे प्रतींनिधी यांच्यातच वाद निर्माण होऊन दोघांनाही त्रास सहन करावा लागतो. पवनस्तंभ उभारणीसाठी एका पेक्षा अधिक खातेदारांच्या जमिनी घेतल्यावर असे प्रकार जास्त घडत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगितले जाते.

### वेगवेगळी माणसे वेगवेगळे शब्द

पवनस्तंभ उभारणे, मनोरा उभारणे, तारा ओढणे , पोल उभारणे यासाठी जमिनी घेताना शेतकऱ्यांसोबत चर्चा करायला आलेली माणसे जमिनीचे भाडे करार करून जातात. आलेले लोक जमीन करारावेळी शेतकऱ्यांना काही अश्वासने देतात. त्यानंतर पवनचक्की उभारणी, मनोरा बांधणीसाठी वेगळीच माणसे येतात. यावेळी मागील आश्वसानाबाबत शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे विचारणा केली असता, पुढील काम करताना करू असे म्हणत वेळ मारत काम करून जातात. प्रत्यक्ष काम पूर्ण करण्यासाठी वेगळीच माणसे येतात आणि शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे मागील आश्वासनाबाबत विचारणा केल्यावर ते त्याबाबत असमर्थता दर्शवतात. परिणामी कोणतेच आश्वासन पाळले जात नसल्याने शेतकऱ्यांकडून काम अडवले जाते आणि वादाला सुरुवात होते.

### शेतकऱ्यांना दिली जात नाहीत कराराची कागदपत्रे

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व कागदपत्रांतील अपुऱ्या ज्ञानाचा गैरफायदा घेत विद्युत तारा, पोल, उच्चदाब विद्युत वाहिनी मनोरे उभारणे , पीक नुकसान, रस्ता यांच्या कराराबाबत शेतकऱ्यांच्या सह्या कोऱ्या कागदांवर घेऊन मध्यस्तांकडून त्यांच्या सोयीप्रमाणे शेतकऱ्यांना असमान मावेजाचे वाटप करतात व कराराची कागदपत्रेही दिली जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. परिणामी शेतकरी मावेजा मिळवण्यासाठी कायदेशीर लढाईही लढू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना एजंटाकडून मिळालेल्या तुटपुंज्या मावेजावरच समाधान मानावे लागत आहे.

### यामुळे आहेत शेतकऱ्यांचे कंपन्यासोबत वाद

कंपन्यांच्या एजंटाकडून लोखंडी पोल, विद्युत तारा व २२० केव्हीचे मनोरे उभारणीची कामे करताना बाधित शेतकऱ्यांना समसमान मावेजा दिला जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. फळबागा, फळझाडे , कुपणालिका, विहीर, गोठा, रस्ता, पीक नुकसान यांचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना न देणे, मोबदल्याचे धनादेश बँकेत न वटणे, एजंटांकडून खोटे बोलून व गैरसमज पसरवून काम करणे, खाजगी गुंडांच्या मदतीने शेतकऱ्यांना अरेरावी व दाबदडपशाही करणे आणि पोलिस यंत्रणाचा वापर करून जबरदस्तीने कामे करणे यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून कंपन्यांचा शेतकऱ्यांशी थेट संवाद नसणे यामुळे शेतकरी व कंपन्या यांच्यात वाद वाढत चालले आहेत

### बोगस करार माफियांचा उदय

पवनचक्की कंपन्यांना विद्युत पोल उभारणे, विद्युत मनोरे उभारणे, विद्युतवाहिनीच्या तारा ओढणे ही कामे शेतकऱ्यांच्या शेतातूनच करावी लागतात. तसेच पवनस्तंभ उभारणीसाठीची अवजड उपकरणे, साहित्य व इतर सामुग्रीची ने–आण रस्त्यांअभावी शेतकऱ्यांच्या शेतातूनच करावी लागते. यावेळी अवजड वाहनांच्या रहदारीमुळे शेतकऱ्यांच्या शेतासह, शेतातील पिकांचे, झाडांचे अतोनात नुकसान होते. यामध्ये पवनचक्की कंपन्यांचे एजंट मध्यस्ती करून स्वलोभापोटी मावेजामध्ये कमी–जास्त करून शेतकऱ्यांना चुकीची माहिती देत तूटपुंजा मावेजा देतात. यावेळी शेतकऱ्यांच्या कोऱ्या कागदांवर साह्य घेत बोगस कागदपत्रे तयार करुन शेतकऱ्यांचे चुकीचे करार करणाऱ्या माफीयांचा तालुक्यात उदय झाला आहे.

### शेतजमिनीचे व्यासायिक मूल्यांकन कमी

पवनऊर्जा निर्मितीसाठी तालुक्यात पवनऊर्जा स्तंभ उभा करण्यात आले असून त्यामधून निर्माण झालेली वीज पावर सबस्टेशन पर्यन्त आणली जाते. तसेच पावर सबस्टेशन मधून ही वीज २२० केव्ही उच्चदाब विद्युतवाहिनी द्वारे अतिउच्छादाब पावर सबस्टेशन पर्यन्त नेली जाते. यावेळी शेतामधून उंच मनोरे, लोखंडी पोल रोवले जातात व त्यावरून उच्छादाब विद्युत ताराद्वारे सबस्टेशन पर्यन्त वीज नेली जाते. परिणामी तालुक्यात सर्वत्र पोल, तारा आणि मनोरेच दिसत आहेत. शेतामधून उंच मनोरे, उच्छदाब पोल व तारा गेल्यामुळे सदरील जमिनीचा भविष्यात व्यावसायिक वापर करण्यासाठी अडचणी येतात. पक्क्या रस्त्यांलगत असलेल्या शेतजमिनींना याचा सर्वाधिक फटका बसतो व व्यावसायिक वापरासाठी जमिनीचे मूल्यांकन कमी होते. पवनचक्कीमुळे पडीक जमिनींना भाव मिळत असला तरी सुपीक जमिनीचे मूल्यांकन घटत आहे.

## सह्याद्री इंटरनॅशनल स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



आरंभ मराठी | धाराशिव

येथील सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल येथे गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका आशा विलास इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुरुपौर्णिमेचे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मूल्यनिष्ठ महत्त्व समजावून सांगितले.त्यांनी आपल्या भाषणात गुरू म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, तर जीवनदृष्टी देणारे मार्गदर्शक असतात. गुरुपौर्णिमा ही आत्मपरीक्षणाची आणि गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आहे. गुरूंनी दिलेल्या ज्ञानाबरोबरच त्यांनी दिलेल्या मूल्यांचा स्वीकार विद्यार्थ्यांनी करावा. महर्षी व्यास यांसारख्या महान गुरूंच्या कार्याचा आदर्श घ्यावा. असे मुद्दे मुद्दे अधोरेखित केले.
कार्यक्रमात सहशिक्षिका कुदळे प्रियांका आणि खांडेकर मनीषा यांनी नाट्य रूपांतराच्या माध्यमातून गुरुपौर्णिमेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवले. विद्यार्थ्यांनीही विविध सादरीकरणांतून गुरू–शिष्य परंपरेची महती व्यक्त केली. तर कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षिका शेख यास्मिन यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संपूर्ण शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कत्तलीखान्यात नेण्यात येणाऱ्या पाच गाईंची सुटका

**वाशी**–गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई करून पाच गाईंची सुटका केली. आरोपी किरण तायाप्पा शिंदे (वय ३८ वर्षे, रा. परंडा) हा ८ जुलै रोजी इंदापुर शिवारातील भैरवनाथ साखर कारखान्या समोर हायवे रोडवर पिकअप (एमएच १३ डिक्यु०७०६) मध्ये गोवंशीय जातीच्या ३ जर्सी गायी १ खिल्लार जातीची गाय व १ गिर गाय असे एकुण वाहनासह ३,५०,००० रुपये किंमतीची गोवंशीय जनावरे त्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना वाशी पोलीसांना मिळून आला.

# ११ वी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांची आर्थिक लूट थांबवावी

## आरंभ मराठीच्या बातमीचा दाखल देत युवासेनेचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आरंभ मराठी IMPACT

आरंभ मराठी | धाराशिव

इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची खोटी माहिती देऊन आर्थिक लूट केली जात असल्याचे वृत्त दैनिक आरंभ मराठीने बुधवारच्या (दि.९) अंकात दिले होते. याच वृत्ताचा दाखल देऊन युवासेनेचे शिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांची लूट थांबवण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली. ११ वी प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाइन प्रणालीमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचा आरोप करत युवासेनेने शुक्रवारी (दि.११) धाराशिव जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले. युवासेनेचे तालुका प्रमुख राकेश सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची केंद्रीय ऑनलाइन प्रणाली ही विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक व सुलभ असायला हवी होती. मात्र, अनेक महाविद्यालयांनी या प्रणालीचा गैरवापर



करत, प्रवेश अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ११ वीच्या प्रवेशासाठी स्वतंत्रपणे ३ हजार ते १२ हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले आहे. युवासेनेने यावर रोष व्यक्त करत म्हटले आहे की, विद्यार्थ्यांना अगोदरच फॉर्म भरताना आवश्यक सर्व माहिती ऑनलाइन पोर्टलवर दिली जाते. त्यानंतरही कॉलेज प्रशासन त्याच माहितीच्या आधारे पुन्हा प्रवेशासाठी वेगळ्या अर्जाची मागणी करत आहे. या अर्जाच्या नावाखाली हजारोंचा आर्थिक भुर्दंड लावला जातोय. ही विद्यार्थ्यांवर अन्यायकारक आणि आर्थिक शोषण करणारी पद्धत असून, यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जाते आहे. तातडीने या पोर्टलवर आधारित महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याप्रकरणी योग्य ती कार्यवाही न झाल्यास युवासेनेच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी युवासेना तालुका प्रमुख राकेश सूर्यवंशी, संकेत सुर्यवंशी, अविनाश शेरखाने, सावन देवगिरे ,राहुल सिरसाठे सर, सिद्दीक तांबोळी, राकेश कचरे, दत्तात्रय सुर्यवंशी, लखन सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

## परंडा तालुक्यातील ७२ ग्रामपंचायतीच्या सरपंचदाचे आरक्षण जाहीर

आरंभ मराठी | परंडा

परंडा ता. १० तालुक्यातील ७२ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत गुरुवारी (ता. १०) काढण्यात आली. तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण पुढील प्रमाणे – अनुसुचित जाती देऊळगाव, भांडगाव, लोणी, वागेगव्हाण अनुसुचित जाती महिला– कात्राबाद, कुंभेजा, जाकेपिंपरी, गोसावीवाडी, कार्ला अनुसुचित जमाती महिला –टाकळी नागरीकांचा मागास प्रवर्ग रोहकल, उंडेगाव, कंडारी, पिंपरखेड, काटेवाडी, येणेगाव, बावची, अनाळा, इनगोंदा, शिराळा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आलेश्वर, खासापूरी, मलकापूर, वडनेर, धोत्री, कपिलापूरी, पिंपळवाडी, चिंचपूर (खु) कुंभेफळ सर्व साधारण – देवगाव (बु) आसू लोहारा, खासगाव रत्नापूर, कौडगाव, दहिटणा, घारगाव, जेकटेवाडी, जवळा (नि) अरणगाव, आवारपिंपरी, वाकडी, खंडेश्वरवाडी, रुई, ढगपिंपरी, कोकरवाडी, नालगाव, भोत्रा, चिंचपूर (बु) शेळगाव मुगाव सर्व साधारण महिला – हिंगणगाव (बु) कांदलगाव, कुक्कडगाव, पाचपिंपळा, साकत (खु) देवगाव (खु) वाटेफळ, रोसा, राजुरी, डोमगाव, साकत (बु) डोणजा, तांदुळवाडी, भोंजा, सोनारी, सिरसाव, हिंगणगाव (खु) पांढरेवाडी, पारेवाडी, अंदोरा खानापूर

# मयत कंत्राटी कर्मचारी मंगल गवळी यांच्या वारसांना शासकीय मदत द्या

## सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांची मुख्याधिकारी यांच्याकडे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव:– येथील नगर परिषदमध्ये सफाई कामगार म्हणून कंत्राटी रोजगारावर काम करणारी महिला मंगल मेसु गवळी यांचे २५ जून रोजी खाजा नगर येथे स्वच्छता करीत असताना एका कारने उडविल्याने निधन झाले. नगर परिषद प्रशासनाच्या वतीने तिच्या एका वारसाला शासकीय सेवेत कायमस्वरुपी नियुक्ती देऊन आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते तथा शहर उपजीविका आराखडा कृती समिती सदस्य गणेश वाघमारे यांनी केली आहे. निवेदनात म्हटले आहे,अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत मंगल गवळी या बेंबळी येथुन दररोज धाराशिवला रोजगारासाठी येणे जाणे करीत होत्या, त्यांची आई आजारी असून तिचा सांभाळ याच करीत होत्या. त्यांना दोन अपत्ये आहेत. ही महिला कंत्राटी कर्मचारी म्हणून रोजंदारीवर असली तरी तिचा रस्त्यावरती अपघाती मृत्यू झाला असल्याने शासनाच्या वतीने तिच्या वारसांना मदत मिळणे गरजेचे आहे,पंढरपूरची वारी असेल या इतर धार्मिक कार्यक्रमामध्ये मृत्यू पावलेल्या वारकरी,भक्तास शासनाकडून आर्थिक मदत मिळते, तसेच कंत्राटी कामगार ज्या टेंडर धारक कंपणी तथा गुत्तेदार यांच्या कडे काम करीत असताना त्या कामगारांना विमा संरक्षण देणे गरजेचे आहे.



गवळी यांच्या वारसांना गुत्तेदाराकडूनही मदत मिळाली पाहिजे,अशी मागणी गणेश रानबा वाघमारे यांनी केली आहे.